# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/02/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## अवैधरीत्या देशी विदेशी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १७/०२/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे आदेशाने स्टाफ अवैध दारू विक्री व जुगार बाबतच्या रेड करणेकामी खाजगी वाहनाने पो.स्टे. सावनेर परिसरात फिरत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, मौजा सावनेर येथुन केळवद कडे एक ईसम पांढऱ्या रंगाच्या बिना नंबरच्या ॲक्टिवा मोटरसायकलवर समोर देशी व विदेशी दारू घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून सावनेर ते केळवद रोडने उड्डानपुलाचे खाली जावुन नाकाबंदी केली असता समोरून एका पांढऱ्या रंगाचे बिना नंबरचे मोपेड मोटरसायकलवर एक ईसम समोर काहीतरी संशयितरित्या घेवुन जातांना दिसुन आल्याने त्यास पोलीस स्टाफने थांबवुन त्याचे मोटरसायकलवर समोर ठेवलेल्या मुद्देमालाची पाहणी केली असता **आरोपी नामे— ललीत जगदीश उपाध्याय वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. ११ चिकन मार्केट सावनेर** हा आपल्या वाहनात अवैधरीत्या विनापरवाना एक पांढऱ्या रंगाच्या विना नंबरची ॲक्टीव्हा ६ जि मोपेड मो. सा. किंमती ५०.०००/—रू मध्ये १) एक खाकी रंगाचा खरडयाचा बॉक्समध्ये अवैधरीत्या विनापरवाना १) भिंगरी देशी दारू ९० एम. एल. च्या १०० निपा किंमती ३५००/—रू २) भिंगरी देशी दारू च्या दोन बॉक्स एकुण ९६ निपा किंमती ६.७२०—/रू ३) ऑफिसर चॉईस ०६ निपा किंमती ९००/—रू ४) रॉयल स्टेज विदेशी दारू च्या १० निपा किंमती १८००/— रू ५) ईम्पेरीयल ब्लु विदेशी दारूच्या १२ निपा किंमती १९२०/— रू ६) रॉयल स्टेज विदेशी दारू च्या १२ निपा किंमती २१६०/—रू असा एकुण ६७०००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आला. सदर मुद्देमालाबाबत आरोपी ललीत उपाध्याय यास अधिक विचारपुस केली असता **आरोपी नामे— २) देवेंद्र खंगारे रा. झेंडा चौक पहलेपार** यांचे सांगणेवरून विक्री करीता वाहतुक करीत असल्याचे सांगितले.

आरोपीतांविरूद्ध कलम ६५ (अ), ६५ (ई) म.दा.का. सहकलम १०९ भादवि प्रमाणे अन्वये होत असल्याने आरोपी १) ललीत जगदीश उपाध्याय वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. ११ चिकन मार्केट सावनेर व २) देवेन्द्र खंगारे रा. झेंडाचौक पहलेपार सावनेर याचेविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, मपोहवा संगिता कोवे, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, महिला पोलीस अंमलदार अश्विनी वांढरे यांनी पार पाडली.

# अवैधरीत्या देशी दारुची
# विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध
# नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब सावनेर विभाग यांचे आदेशाने दिनांक १८/०२/२०२४ रोजी अवैध दारू विक्री व जुगार बाबतच्या रेड करणेकामी स्टाफ खाजगी वाहनाने पो.स्टे. सावनेर परिसरात पेट्रोलींग करित असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, मौजा बोरूजवाडा येथे मालु पेपर मिलजवळ उमाशंकर ठाकुर हा त्याचे मालकीचे गायीच्या गोठ्यामध्ये अवैध्यरित्या देशी दारूची विक्रि करित आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर खबरेवरून स्टाफ यांनी सावनेर ते नागपुर रोडवरील मालु पेपर मिल समोरील आरोपी उमाशंकर रामशरण ठाकुर वय २७ वर्ष धंदा मजुरी रा. वार्ड न. १ माळेगाव ता. सावनेर जि. नागपुर त्याचे गोठयाची झडती घेतली असता गोठ्याचे मागे असलेल्या खोलीमध्ये एका लाल रंगाच्या प्लॉस्टीक पिशवीमध्ये १) भिंगरी १८० एम. एल च्या ८६ प्लास्टीक बॉटल प्रत्येकी किंमत ७०/– रू एकुण किंमती ६०२०/– रू. २) वन प्लस कंपनीचा व जिओ कंपनीचे सिम असलेला मोबाईल किंमती १५,५००/– रू ३) नगदी २२४०/– रू. असा एकुण २३,७६०/– रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध कलम ६५ (ई) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, सपोनि दिलीप पोटभरे, पोशि मोहम्मद दाउद, नितेश परखड यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**